14-03-2025-Dai-03ff_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/13/2025 11:44 PM Page 1



# उच्च न्यायालयाच्या निर्णयावर पर्यावरण संघटनांचे समाधान

## सरकारवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** उच्च न्यायालयाने टाउन अँड कंट्री प्लॅनिंग (टीसीपी) कायद्याच्या कलम १७(२) संदर्भातील नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे रद्द केल्याच्या निर्णयावर गोव्यातील विविध पर्यावरण संघटनांनी समाधान व्यक्त केले आहे. हा निर्णय पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने मोठे पाऊल असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

गोवा फाऊंडेशनचे संचालक डॉ. क्लॉड अल्वारिस यांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, उच्च न्यायालयाने घटनात्मक बाबी विचारात घेत दिलासा दिला आहे. इको-झोनचे संरक्षण करणे ही सरकारची जबाबदारी असताना सरकार स्वतःच त्याचे शत्रू बनले आहे. त्यामुळे राज्यातील नागरिकांना न्यायासाठी न्यायालयात जाण्याशिवाय पर्याय उरला नव्हता. मार्गदर्शक तत्त्वे आणि नियम रद्द झाल्यामुळे या कायद्याअंतर्गत केलेली सर्व कार्यवाही रद्द होणार



आहे. हा गोव्यातील लोकांचा मोठा विजय आहे, कारण कलम १७(२) मुळे विशेषतः दिल्लीतील हितसंबंधी गटांकरिता झोन बदलांसाठी मोठ्या रकमेची देवाणघेवाण करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात राज्यभर संताप पसरला होता,

गोवा बचाव अभियानाच्या सह-संयोजिका सबिना मार्टिन्स यांनीही या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी म्हटले आहे की, उच्च न्यायालयाने कलम १७(२) रद्द केल्याने पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण होईल. शेते, टेकड्या, वाळूचे ढिगारे, खारफुटी आणि जलकुंभांचे रक्षण करण्यासाठी गोवा बचाव अभियान लढत आहे. कलम १७(२) मुळे नागरिकांचा सहभाग व नियोजनाची प्रक्रिया बाधित झाली होती. माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागितलेली माहिती टीसीपी विभागाने अद्याप उपलब्ध केलेली नाही. तरीही हा निर्णय लोकशाही आणि पर्यावरण रक्षणाच्या दिशेने मोठे यश आहे.

पर्यावरणवादी स्वप्नेश शेर्लेकर यांनी सरकारवर कठोर टीका करत मंत्री आणि मुख्य नगररचनाकारांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. त्यांनी सांगितले, सरकारने चुकीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे समर्थन करण्यासाठी कोट्यवधी रुपये बाह्य वकिलांवर खर्च केले. आता जबाबदारी स्वीकारून संबंधित पदाधिकाऱ्यांनी नैतिक जबाबदारी घ्यावी. दरम्यान, फेडरेशन ऑफ रेनबो वॉरियर्सचे संस्थापक अभिजित प्रभुदेसाई यांनी मात्र हा निर्णय अपुरा असल्याची प्रतिक्रिया दिली. त्यांनी सांगितले की, कलम १७(२) हे असंवैधानिक असल्याचे आम्ही सातत्याने सांगत आलो आहोत. संपूर्ण कलम रद्द करणे आवश्यक आहे. जर सरकारने नवीन मार्गदर्शक तत्त्वे आणली, तर त्याविरोधात लढा देण्यास आम्ही सज्ज आहोत. ग्रामीण गोव्यात शाश्वत विकासाची गरज आहे आणि तो शहरी विकासाशी संबंधित असता कामा नये. त्यामुळे प्रादेशिक योजना आणि बाह्यरेखा विकास योजना यामधील सीमांकन स्पष्ट राहिले पाहिजे. या निर्णयामुळे गोव्यातील पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला असून, राज्य सरकारच्या विकास धोरणांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

## भूतानीचा पर्यावरणीय मंजुरीसाठी नव्याने अर्ज; ग्रामस्थांचा तीव्र विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** सावरफोंड, सांकवाळ येथे प्रस्तावित बहु-कुटुंबीय निवासस्थान आणि व्हिला प्रकल्पासाठी परमेश कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड अर्थात भूतानी इन्फ्राने नवीन पर्यावरणीय मंजुरीसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, स्थानिक ग्रामस्थांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला आहे.

पीटर डिसोझा आणि इतर चार जणांनी दाखल केलेल्या रिट याचिकेतील प्रतिज्ञापत्रात परमेश कन्स्ट्रक्शन कंपनीने हे स्पष्ट केले आहे. याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. रिचर्ड अल्मेडा यांनी सांगितले की, भूतानी इन्फ्राने सध्या प्रकल्पाचे काम थांबवले असून पर्यावरणीय मंजुरी मिळेपर्यंत कोणतेही काम सुरू करणार नसल्याचे त्यांनी प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. तसेच पर्यावरणीय मंजुरीसाठी एका एजन्सीला नेमले असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

ॲड. अल्मेडा यांनी याचिकेत जुन्या पर्यावरणीय मंजुरीच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कंपनीने माती परीक्षणासाठी एका एजन्सीची नियुक्ती केल्याचे सांगितले आहे. याचिकाकर्त्यांनी विकास परवानगीला देखील आव्हान दिले आहे. राष्ट्रीय हरित लवादाने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये आदेश दिल्यानंतर केवळ तीन महिन्यांत कंपनीला रूपांतरण सनद कशी मिळाली, यावरही याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतला आहे. भूतानी इन्फ्राला मुरगाव नियोजन आणि विकास प्राधिकरणाने २ फेब्रुवारी २०२४ रोजी विकास परवानगी दिली होती. तसेच सांकवाळ ग्राम पंचायतीने ११ मार्च २०२३ रोजी बांधकाम परवाना जारी केला होता. परमेश कन्स्ट्रक्शन कंपनीने १४ जुलै २०२३ रोजी सांकवाळ मधील सावरफोंड येथे एएनएस कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडकडून ३५,०५० चौरस मीटर जमीन खरेदी केली होती. या जागेवर बहु-कुटुंबीय निवासस्थाने आणि व्हिलांचे बांधकाम करण्याचा कंपनीचा मानस आहे. मात्र, भूतानी इन्फ्राच्या या वादग्रस्त गृहनिर्माण प्रकल्पाला स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला आहे. या प्रकल्पामुळे पर्यावरण आणि स्थानिक समुदायाचा ऱ्हास होईल, असा ग्रामस्थांचा दावा आहे.

## निवडक



मांद्रे : गांजा पकडलेली पोलिसांची टीम.

## मांद्रेत ११.६० लाखांचा गांजा जप्त संशयित महिलेला अटक : मांद्रे पोलिसांची कारवाई

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १३ :** नाईकवाडा मांद्रे येथे गुरुवारी मांद्रे पोलिसांनी धाड टाकून सुमारे अकरा लाख साठ हजार रुपयांचा ११ किलो गांजा जप्त केला. याप्रकरणी संशयित पार्वती रॉय हिला अटक करण्यात आली. मांद्रे पोलिस निरीक्षक शेरीफ जॅकीस यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री अडीच वाजता नाईकवाडा मांद्रे येथील यश शूटिंग अकादमी परिसरात एक धाड टाकून गांजा घेऊन जात असलेल्या पार्वती रॉय (२९ रा. पं. बंगाल) हिला ताब्यात घेतले आणि तिच्याकडे ११ किलो गांजा सापडला. संशयित पार्वती ही कांदोळी येथे एका भाड्याच्या खोलीत राहत होती. ती अमली पदार्थाचा व्यवहार करत असल्याची माहिती मांद्रे पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर उपनिरीक्षक अर्चना शर्मा यांच्या नेतृत्वाखाली एक टीम तयार केली व रात्रभर शोध मोहीम सुरू केल्यानंतर अडीच वाजता संशयित पार्वती अंमली पदार्थ घेऊन आली. त्यावेळी पोलिसांनी तिची झडती घेतली असता तिच्याकडे ११ लाख ६० हजार किमतीचा गांजा सापडला. मांद्रे पोलिसांनी घटनेची पंचनामा करून तिला अटक करण्यात आली. अधिक तपास मांद्रे पोलिस करीत आहेत.

---

## कामुर्लीत घराला आग लागून २ लाखांचे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १३ :** मायना पाटो, कामुर्ली येथील व्हिली डिकुन्हा यांच्या घराला आग लागून २ लाखांचे नुकसान झाले. म्हापसा अग्निशमन दलाच्या जवानांनी वेळीच आग नियंत्रणात आणल्याने मोठी दुर्घटना टळली. सुक्या गवताला लागलेली आग पसरून घराला लागली. सदर घटना सोमवारी सकाळी ११.४० च्या सुमारास घडली. यावेळी डिकुन्हा कुटूंबिय घर बंद करून बाहेर गेले होते. घराच्या मागील बाजूला मोकळ्या जागी असलेल्या सुक्या गवताला कुणीतरी आग लावली होती. उष्णतेमुळे ही आग भडकली व पसरून घराला लागली. यात कौलारू घरातील स्वयंपाकघराची खोली व दुसऱ्या एका खोलीचे नुकसान झाले. स्वयंपाकघरातील फ्रीज, ओव्हन, इतर घरगुती वस्तू व छप्पर जळाले. घटनेची माहिती मिळताच म्हापसा अग्निशामक दलाचे हवालदार विष्णू गावस, देवेंद्र नाईक, प्रविण गावकर, भिकाजी काळोजी व लविंदर साळगावकर यांनी पर्वरी दलाच्या जवानांच्या मदतीने आग नियंत्रणात आणली. पण तोपर्यंत दोन लाखांचे नुकसान झाले.

---

## बागात कारच्या धडकेत दोन कामगार जखमी

■ टीम दैनिक हेराल्ड

**बागा, दि. १३ :** येथे एका कर्नाटकच्या कारगाडीने दोन कामगार जखमी झाले असून, अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. पर्यटकांनी पहिल्यांदा बागा येथील पार्किंग क्षेत्रात उभ्या असलेल्या एका वॅगनआर गाडीला जोरदार धडक दिली. या धडकेत वॅगनआर गाडी जवळपास ७-८ मीटरपर्यंत फरफटत गेली आणि जवळून चालणारे दोन कामगार या अपघातात जखमी झाले आहेत. या कर्नाटकातील कारगाडीने स्थानिक टॅक्सी चालक सनी नार्वेकर यांच्या मालकीच्या एर्टिगा गाडीलाही धडक दिली आणि त्यानंतर चालक कार घेऊन घटनास्थळावरून वेगाने पसार झाला. घटनेची माहिती मिळताच, सतर्क टॅक्सी चालकांनी कारचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पर्यटकांनी कार वेगाने पळवल्याने त्यांना पकडण्यात स्थानिकांना अपयश आले. या घटनेनंतर काही वेळाने ही कार बागा येथील एका कॅसिनोबाहेर दिसली. त्यानंतर तेथूनही ते निघून गेले. या घटनेमुळे बागा परिसरात खळबळ उडाली असून, स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या अपघातामुळे जखमी झालेल्या कामगारांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले असून या घटनेची माहिती मिळताच, पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि कारचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत.

---

## फोंड्यात उद्या शिमगोत्सव; कार्यक्रम जाहीर

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १३ : राज्यात १५ ते २९ मार्च या कालावधीत शिमगोत्सव होणार आहे. या शिमगोत्सवाच्या माध्यमातून विविध शहरांमध्ये गोव्याचा समृद्ध वारसा दर्शविणारे चित्ररथ, पारंपरिक लोकनत्यृ आणि भव्य मिरवणुका पाहायला मिळणार आहे. फोंडा येथे दि. १५ मार्चपासून या उत्सवाला सुरुवात होईल. १६ मार्च रोजी मडगाव, १७ मार्च केपे, १८ मार्चला कुडचडे, १९ मार्च शिरोडा, २० मार्च कळंगुट आणि डिचोली, २१ मार्च रोजी वास्को, २२ मार्च रोजी पणजी येथे शिमगोत्सव मिरवणूक होईल. म्हापसा आणि सांगे येथील रस्ते २३ मार्च रोजी शिमगोत्सव मिरवणुकीने फुलतील, तर २४ मार्च रोजी काणकोण आणि कुंकळ्ळी येथे भव्य मिरवणूक पहायला मिळेल. २५ मार्च रोजी पेडणे, २६ रोजी धारबांदोडा, २७ वाळपई, २८ रोजी साखळी आणि शेवटी २९ मार्च रोजी मांद्रे येथे मिरवणुकीची सांगता होईल. उत्सवाच्या प्रत्येक दिवशी, विविध ठिकाणांवर भव्य परेड होईल.

---



साळ : येथे होळी घेऊन येताना भाविक.

## साळ येथील प्रसिद्ध गडे उत्सव आजपासून; जय्यत तयारी : भाविकांची गर्दीची शक्यता

टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. १३ : येथील प्रसिद्ध गडे उत्सवास उद्या शुक्रवार, दि. १४ पासून सुरुवात होणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवाची सांगता १६ रोजी होईल. या उत्सवासाठी हजारो भाविक साळ येथे दाखल होणार असल्याने ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली आहे. गुरुवारी होळी दिवशी सकाळी बोर्डे येथून ६५ फूट लांबीचे झाड आणून त्याची पूजा करून मध्यरात्री मंदिरासमोर होळी उभारण्यात आली. होळी उभारल्यानंतर उद्यापासून रात्रीपासून गडे पडण्यास सुरुवात होते. अदृश्य रुपातील देवदेवता व दृश्य रूपातील गडे यांचा हा रात्रीचा चालणारा खेळ पाहण्यास हजारो भाविक येतात. गडे उत्सवासाठी येणाऱ्या भाविकांनी धुमासेमार्गे रात्री दहाच्या नंतर प्रवेश करू नये तर कासारपाल मार्गे येणाऱ्या भाविकांनी रात्री ११ च्या नंतर कासारपाल मार्गे येऊ नये. येथे उपस्थित असणाऱ्या पोलीस व वाहतूक पोलीस यंत्रणा यांना योग्य ते सहकार्य करावे, असे आवाहन साळ देवस्थानने केले आहे.

## मुलीचे अपहरण; संशयितास अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १३ :** बोर्डे डिचोली येथून एका अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी डिचोली पोलिसांनी बंगळुरू येथून संशयित सूरज देवगिरे याला मुलीसह अटक केली. डिचोलीचे उपअधीक्षक जीवबा दळवी यांनी दिलेल्या माहितीनुसार ४ मार्च रोजी आपल्या मुलीचे बोर्डे डिचोली येथून एका अज्ञाताने अपहरण केल्याची तक्रार वडिलांनी केली होती. तक्रारीनंतर संशयिताचा शोध घेण्यात आला तांत्रिक विश्लेषण करून, श्रीनिवासपुरा कर्नाटक येथे संशयिताच्या मुसक्या आवळण्यात आल्या. पोलिस उपनिरीक्षक कृष्णा गावस, शिपाई विशाल परब आणि शिपाई जानू दवणे यांच्या पथकाने संशयिताला अटक करून मुलीची बंगळुरू येथून सुटका केली.सध्या आरोपी पोलिस कोठडीत आहे आणि पीडित अल्पवयीन मुलीला अपना घर येथे सुरक्षितपणे ठेवण्यात आले आहे. अल्पवयीन पीडित मुलीचा जबाब नोंदवण्यात आला, ज्यामध्ये तिने आरोपीने तिच्याशी लैंगिक संबंध ठेवल्याचे सांगितले.

# हौसीला अडकवण्याच्या हालचाली सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १३ :** गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात बक्षिसे देण्यात येत असल्याने चर्चेत असलेला 'हौसी' हा लोकप्रिय खेळ आता स्थानिक पोलिसांच्या चौकशीच्या फेऱ्यात अडकण्याची शक्यता आहे. तथापि, कायदा आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण जर होत नसेल अशा प्रकारच्या क्रियाकलापांना पूर्णपणे थांबवण्यासाठी कोणतेही विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे नसल्याचे राज्य अधिकाऱ्यांनी उघड केले आहे.

काही प्रकरणांमध्ये कोलवा पोलिसांनी हस्तक्षेप केला आहे आणि काही आयोजकांना त्यांच्या क्रियाकलाप थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, कायदेशीर कारणांशिवाय हौसी खेळ थांबवता येणार नाहीत किंवा प्रतिबंधित केले जाऊ शकत नाहीत, कारण ते लॉटरी नियमांतर्गत येत नाहीत.

सूत्रांनी सांगितले की कोलवा पोलिसांनी एका आयोजकांना बोलावून त्यांच्या अधिकारक्षेत्रात या आठवड्यात होणारा आगामी हौसी कार्यक्रम रद्द करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे पोलिसांच्या हस्तक्षेपाच्या कायदेशीर आधाराबाबत वादविवाद सुरू झाला आहे, काहींनी हा खेळ थांबवण्याच्या त्यांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.हौसीची क्रेझ दक्षिण गोव्यात, विशेषतः साष्टी मध्ये वेगाने पसरली आहे, बक्षिसे १५ लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहेत. गोव्यातील सहभागी आपले नशीब आजमावण्यासाठी या कार्यक्रमांमध्ये गर्दी करत आहेत.कोलवा पोलिस निरीक्षक रितेश तारी यांनी स्पष्ट केले की, आयोजकांना हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आवश्यक सरकारी परवानग्या नसल्याचे आढळल्यानंतर त्यांना त्यांचा खेळ थांबवण्यास सांगण्यात आले.कोलवा पोलिसांच्या अधिकारक्षेत्राबाहेरील एका आयोजकाने हेराल्डला सांगितले की, हा खेळ आयोजित करण्यासाठी त्यांना हौसी तिकिट विक्रीवर जीएसटी भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

येत्या आठवड्यात साष्टीमध्ये हौसी खेळांसह अनेक मनोरंजन कार्यक्रम रांगेत असूनही - एक कार्यक्रम २० लाख रुपयांचा बक्षीस पूल देखील होता - तरीही कोणत्याही पोलिस स्टेशनला या उपक्रमांवर बंदी घालणारे अधिकृत परिपत्रक किंवा निर्देश मिळालेले नाहीत.एका वरिष्ठ अधिकाऱ्याने टिप्पणी केली की, हौसी खेळ वर्षानुवर्षे खेळला जात आहे, अगदी शालेय कार्यक्रमांमध्येही. हा मुद्दा आता मोठ्या प्रमाणात बक्षीस रकमेभोवती केंद्रित आहे. प्रत्यक्षात, पोलिस या उपक्रमांना थांबवू शकत नाहीत, कारण त्यांना असे करण्यास सक्षम करणारे कोणतेही स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे नाहीत.

## हौसी खेळांवर कारवाईची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १३ :** गोवा राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी अध्यक्ष पीटर बोर्जेस यांनी राज्यात 'हौसी' (लोट्टो) खेळांच्या वाढत्या प्रसाराबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली असून, मुलांना अशा जुगाराच्या खेळांपासून वाचवण्यासाठी तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मुख्य सचिव आणि दोन्ही जिल्ह्यांच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात बोर्जेस यांनी गोव्यात मोठ्या प्रमाणावर 'हौसी' खेळांचे आयोजन आणि त्यातील लाखो रुपयांच्या बक्षिसांवर प्रकाश टाकला आहे. एकेकाळी अनौपचारिक आणि मनोरंजनासाठी मर्यादित असलेला हा खेळ आता उच्च-दाबाच्या जुगाराच्या स्वरूपात विकसित झाला असून, यामुळे मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग वाढला आहे. बोर्जेस यांनी विशेषतः मुलांच्या सहभागाच्या मुद्द्यावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. मुले जुगाराच्या संपर्कात येत असल्याने लहान वयातच जुगाराच्या सवयी रुजण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे व्यसन, आर्थिक अस्थिरता आणि गुन्हेगारी नेटवर्कद्वारे शोषणाचा धोका वाढत आहे, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

बोर्जेस यांनी गोवा बाल कायदा, २००३ मधील कलमांचा संदर्भ देत बाल संरक्षण कायद्यांच्या उल्लंघनावर लक्ष वेधले आहे. कलम ७(१)(ब) नुसार, कोणत्याही मुलाचे आर्थिक शोषण होता कामा नये किंवा त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या क्रियाकलापांमध्ये सहभागी होता कामा नये. तसेच, कलम ८(३)(अ) नुसार, जुगार आणि मादक पदार्थांच्या गैरवापरासारख्या हानिकारक प्रभावांपासून मुलांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, २०१५ नुसारही मुलांना त्यांच्या कल्याणासाठी हानिकारक वातावरणात ठेवणाऱ्या कृत्यांना गुन्हेगार ठरवले आहे. विशेषतः कलम ७५ आणि ७६अंतर्गत मुलांना अनावश्यक जोखमीला सामोरे जावे लागू नये आणि आर्थिक फायद्यासाठी त्यांचा वापर केला जाऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यात 'हौसी' खेळांचा अनियंत्रित विस्तार सुरूच राहिल्यास मुलांमध्ये जुगाराची सवय आणि आर्थिक शोषणाची प्रवृत्ती वाढू शकते. यामुळे त्यांच्या मानसिक आणि सामाजिक विकासावर गंभीर परिणाम होईल. तातडीने कठोर कारवाई न झाल्यास हा धोका अधिक गडद होईल, असा स्पष्ट इशारा बोर्जेस यांनी दिला आहे.



## आश्वे भूमिका मंदिर परिसरात होळी घालण्यावरून दोन गटात वाद

▶ **अखेर पेडणे उपजिल्हाधिकाऱ्यांचा तात्पुरता तोडगा : बाचाबाचीसह एकमेकांना मारहाणीचा प्रकार**

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १३ : आश्वे- मांद्रे येथील श्री भूमिका देवस्थान महाजन आणि ग्रामस्थ असे दोन गट पडले असून उत्सव व विधीवरून पुन्हा गुरुवारी वाद उफाळून आला. होळीच्या निमित्ताने दोन्ही गट मंदिर समोर होळी घालण्यासाठी गोळा झाले आणि होळी कोणी घालावी? यावरून दोन्ही गटांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्यानंतर काही प्रमाणात मारहाणही एकमेकांना करण्यात आली. या घटनेची माहिती मांद्रे पोलिसांना मिळताच तातडीने मांद्रे पोलिस घटनास्थळी दाखल झाले. याबरोबर पेडणे उपजिल्हाधिकारी शिवप्रसाद नाईक यांनीही घटनास्थळी धाव घेतली व तात्पुरता तोडगा काढला.

पेडणे उपजिल्हाधिकारी नाईक यांनी देवस्थान पंचायतन अध्यक्षांनी एका गटाला होळी घालण्याची दिलेली परवानगी कायम ठेवली व हा वाद तात्पुरता मिटविला.

दोन्ही गटांमध्ये सुरुवातीला बरीच शाब्दिक चकमक काही प्रमाणात एकमेकांना मारहाणही झाली. मात्र, अजूनपर्यंत पोलीस तक्रार नोंद करण्यात आली नाही.

यासंदर्भात मांद्रे पोलिस निरीक्षक शेरीफ जॅकीस यांच्याकडे संपर्क साधला असता आपल्याकडे अजूनपर्यंत लेखी एकाही गटाकडून तक्रार आली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## सहा महिन्यांत पूर्ण क्षमतेने खाणकाम सुरू करण्याचा दावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांचे आणि निर्देशांचे काटेकोर पालन करून गोव्यातील खाणकाम पूर्ण क्षमतेने पुढील सहा महिन्यांत सुरू होईल, अशी माहिती केंद्रीय खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी गुरुवारी दिली. रेड्डी म्हणाले, पर्यावरण, महसूल उत्पन्न आणि रोजगार निर्मिती यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांना तोंड देत राज्य सरकार खाणकाम सुरू करण्याच्या तयारीत आहे. ते एक्सप्लोरेशन लायसन्स ब्लॉक्सच्या लिलावाच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनावेळी बोलत होते.

या उपक्रमाचा उद्देश भारतातील दुर्मिळ पृथ्वी घटक (आरईई), झिंक, हिरा, तांबे आणि प्लॅटिनम गट घटक (पीजीई) यांसारख्या महत्त्वाच्या खनिज स्रोतांचा शोध घेण्यासाठी खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवणे असल्याचे मंत्री म्हणाले . केंद्रीय मंत्र्यांनी 'एआय वापरून खनिज लक्ष्यीकरण' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या खनिज ब्लॉक्सच्या लिलावाच्या पाचव्या टप्प्याचा रोड शो आणि हॅकेथॉन २०२५ चा शुभारंभ केला. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी यावेळी सांगितले की, गोव्यात एक किंवा दोन महत्त्वाच्या खनिजांचे अस्तित्व आढळून आले आहे आणि लवकरच त्यांचा शोध सुरू केला जाईल. सावंत यांनी पुढे स्पष्ट केले की, लिलाव झालेल्या १२ खनिज ब्लॉक्सपैकी ९ ब्लॉक्सचे काम लवकरच सुरू होईल. उर्वरित ब्लॉक्स केंद्रीय पर्यावरण मंत्रालय आणि केंद्रीय खाण मंत्रालयाशी संबंधित तांत्रिक अडचणींमुळे विलंबित आहेत. योग्य नियोजन केल्यास २०२५ मध्ये गोव्यात खाणकाम पूर्ण क्षमतेने सुरू होईल अशी आशा आहे, असे सावंत यांनी नमूद केले. कार्यक्रमानंतर केंद्रीय मंत्र्यांनी खाण आणि भूगर्भशास्त्र संचालनालयाच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. राज्य सरकारला केंद्राच्या मदतीने खाणकामाशी संबंधित समस्या सोडवण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बैठकीत संभाव्य खाण ब्लॉक्सचा लिलाव, नॉन-ऑपरेशनल खाणींचे पुनरुज्जीवन आणि कालबाह्य झालेल्या लीजच्या स्थितीवर सविस्तर चर्चा झाली. लिलाव करण्यात आलेल्या खाण ब्लॉक्सच्या कार्यान्वितताचा आणि जीएसआय एमईसीएल , राज्य अन्वेषण संस्था आणि एनपीईए सारख्या संस्थांनी चालवलेल्या प्रकल्पांच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. या बैठकीला सचिव (खाणमंत्री) व्ही.एल. कांथा राव, मुख्य सचिव डॉ. व्ही. कँढावेलो यांसह खाजगी कंपन्यांचे प्रतिनिधी, संभाव्य बोलीदार, सार्वजनिक उपक्रम, जीएसआय, एमईसीएल आणि पर्यावरणतज्ज्ञ उपस्थित होते. शाश्वत आणि जबाबदार खाणकामाला चालना देण्यावर भर देण्यात आला.

